N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली  **P.S.(ठाणे):** कडेगांव

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0202  **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/11/2023 01:49

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 17/11/2023

**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/11/2023

**Time From (वेळेपासून):** 11:37 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 16:09 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 18/11/2023  **Time (वेळ):** 01:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 003

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/11/2023 01:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

पूर्व, 1 किमी  **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** प्रशासकीय कार्यालय कडेगांव,कडेगांव

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 18.11.2023

मी अमोल बाळासो पवार, वय 38 वर्ष, व्यवसाय:- शेती, रा. पलूस, आंधळी रोड, इंगळे पाझर तलाव शेजारी पवार मळा पलूस, ता.पलूस, जि. सांगली. मो.नं. 9226363472.

मी वरील ठिकाणी माझ्या कुटुंबासहीत राहण्यास आहे. माझी मौजे पलूस येथे गट नं.168/4 क्षेत्र 3 आर अशी जमीन होती. सदर जमिनी पैकी सौ. मंजुळा मलकाण्णा कांबळे, रा. पलूस यांना 0.140 चौ. मि. व सौ.सिमा बाळु रायारू, रा. पलूस यांना 0.93 चौ. मि. अशी जमिन दि.29.09.2020 रोजी खरेदी कराराने करारपत्र करून दिलेली होते. तदनंतर सदर जमिनीचे नगरपालिकेचे नियमीतीकरण करून घेवून सौ. मंजुळा मलकाण्णा कांबळे, रा. पलूस यांना दि.20.04.2023 रोजी व सौ.सिमा बाळु रायारू, रा. पलूस यांना दि.12.05.2023 रोजी सब रजिष्टर कार्यालय पलूस येथे खरेदीपत्रा व्दारे जमिन दिलेली आहे.

तदनंतर उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव यांचेकडील दि.27.10.2023 रोजीचे पत्राव्दारे मला व वरील जमिन खरेदी घेणार सौ. मंजुळा मलकाण्णा कांबळे व सौ.सिमा बाळु रायारू यांना "नगरपंचायतीकडून वितरीत केलेल्या गुंठेवारी विकास नियमाधीन प्रमाणपत्राचे आधारे खरेदीपत्र केलेबाबत" या विषायानवये सदरचा व्यवहार महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम 1966 मधील तरतुदीविरूध्द झालेला असलेबाबत नोटीस देण्यात आलेली होती. त्यामुळे वरील जमिन खरेदी घेणार सौ.मंजुळा मलकाण्णा कांबळे व सौ.सिमा बाळु रायारू यांनी मला त्या नोटीस बाबत विचारणा करून रितसर कागदोपत्री पुर्तता करून घेणेबाबत सांगितलेले होते.

त्यानंतर मी दि.08.11.2023 रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव येथे जावून श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांची भेट घेवून त्यांना सदरच्या नोटीस दाखविल्या असता त्यांनी मला वरील जमिनीचे अकृषीक आकारणी करून गंुठेवारी नियमानुकुल आदेश देणेकरीता खरेदी घेणार यांचे नावे गुंठेवारी नियमानुकुल करणेबाबत अर्ज व कागदपत्रे देण्यास सांगितली होती. त्याप्रमाणे मी त्याच दिवशी सौ.मंजुळा मलकाण्णा कांबळे व सौ.सिमा बाळु रायारू यांचे नावचा गंुठेवारी नियमानुकुल करणेबाबत अर्ज व कागदपत्रे उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव येथे देवून पोहच घेवून श्री.सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांची पुन्हा भेट घेतली. त्यावेळी श्री.सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी मला सदर जमिनीची अकृषीक आकारणी करून गुंठेवारी नियमानुकुल आदेश देणेसाठी शासकीय फी व्यतिरीक्त सौ.मंजुळा मलकाण्णा कांबळे यांचे 0.140 चौ. मि. क्षेत्रासाठी 25,000/- रूपये व सौ. सिमा बाळु रायारू यांचे 0.93 चौ. मि. क्षेत्रासाठी 20,000/- रूपये असे एकुण 45,000/- रूपये लाचेची मागणी करून दिवाळी झालेनंतर येणेस सांगितले व सदरचे पैसे दिले नाही तर आमचे खरेदीपत्राची नोंद रद्द करणार असलेबाबत सांगितले.

दि. 17.11.2023 रोजी मी उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव येथे जावून श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांची भेट घेवून शासकीय नियमानुसार अकृषीक आकारणी करून गुंठेवारी नियमानुकुल आदेश मिळणेबाबतची शासकीय फी भरून आदेश मिळणेकरीता विनंती करणार आहे. परंतू श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांना त्यांनी मागणी केलेप्रमाणे 45,000/- रूपये दिले नाही तर ते मी वरील विक्री केलेल्या जमिनीची खरेदी पत्राची नोंद रद्द करतील याची मला खात्री आहे. श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांना मला लाच देण्याची इच्छा नसल्याने मी काल दि.16.11.2023 रोजी सायंकाळी 8.30 वा चे सुमारास पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली यांना फोनवर संपर्क साधुन माझी श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार सांगितली होती. त्यावेळी पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील यांनी मला उदईक रोजी कडेगाव येथे आलेनंतर संपर्क करीत असलेबाबत सांगितले होते.

दि.17.11.2023 रोजी श्री. संदीप पाटील साहेब यांना मी सकाळी 09.20 वा चे सुमारास संपर्क केला असता

मोटारसायकल मध्यवती प्रशासकीय कार्यालयाचे पार्किंगमध्ये पार्क करून कार्यालयामध्ये आतमध्ये उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव येथे गेलो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब व सापळा पथक असे उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव कार्यालयाचे आवारात सापळा लावून थांबले.

मी व पंच परांजपे असे नायब तहसिलदार श्री. सुनिल चव्हाण यांचे कक्षामध्ये जावून त्यांची भेट घेतली. त्यावेळी श्री. सुनिल चव्हाण यांनी माझे कामा संदर्भात चर्चा करून सौ.मंजुळा मलकाण्णा कांबळे यांची फाईल नंबर 113/2023 व सौ. सिमा बाळु रायारू यांची फाईल नंबर 114/2023 अशी माझे ताबेत देवून त्यामधील पत्रावर मंडल अधिकारी पलूस यांच्या सहया घेवून सदरच्या दोन्ही फाईल पुन्हा त्यांचेकडे जमा करणेस सांगितले. तसेच त्यावेळी सुनिल चव्हाण यांनी सौ.मंजुळा मलकाण्णा कांबळे यांचे नावचे चलन नंबर एमएच 011074233 रक्कम रूपये 2073/- व सौ. सिमा बाळु रायारू यांचे नावचे चलन नंबर एमएच 011073664 रक्कम रूपये 1431/- अशी रक्कम बँकेमध्ये भरण्यास सांगितले. त्यानंतर सुनिल चव्हाण यांनी मला त्यांचे कक्षामधून बाहेर नेवून कार्यालयातील समोर डावे बाजुस रिक्त असलेल्या एका कक्षामध्ये नेवून लाच रक्कम सदर कक्षामधील टेबलचे ड्रॉवर मध्ये ठेवण्यास सांगितली. परंतू मी लाच रक्कम सदर कक्षामधील ड्रॉवर मध्ये न ठेवता चलन भरणेकामी मी व पंच असे कार्यालयातून बाहेर निघून आलो.

त्यानंतर मी व पंच परांजपे असे माझेकडील मोटारसायकलने कार्यालयाचे बाहेर येवून कडेपूर ते विटा जाणारे रोडला काही अंतरावर आलो. त्यावेळी आमचे पाठोपाठ सापळा पथक त्यांचेकडील खाजगी वाहनाने आले. काही अंतरावर पाटील साहेब यांनी मला रोडकडेला थांबवून माझेकडील व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला त्यांचेकडील कारमध्ये येवून बसण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी त्यांचेकडील कारमध्ये येवून बसलो. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला सापळयाची हकीकत विचारली असता मी त्यांना सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी लाचेची रक्कम ही कार्यालयातील एका कक्षामधील टेबलचे ड्रॉव्हर मध्ये ठेवण्यास सांगितल्याने मी लाच रक्कम सदर ठिकाणी ठेवली नसल्याचे सांगितले. दरम्यान मुदतीत श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचा 8262921161 या मोबाईल नंबर वरून माझे मोबाईलवर फोन येत असल्याचे मी पाटील साहेब यांना सांगितले. त्यावेळी पाटील साहेब यांनी मला सुनिल चव्हाण यांचा फोन उचलून फोन लाऊड स्पिकवर घेण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी सुनिल चव्हाण यांचा फोन उचलून फोन लाऊडस्पिकवर घेतला असता सुनिल चव्हाण यांनी मला "ती कागदपत्रे आतमध्ये कुठ ठेवल्यात मगाशी?" अशी विचारणा केली त्यावेळी मी त्यांना "ती तुम्ही ड्रॉव्हर दाखविला... ड्रॉव्हरच घावला नाय मला कुठ, ती माणस नव्हती व्हय तुमच्यापाशी, त्यामुळे कुठे पैसे ठेवायच अशा विषय झाला" असे म्हणून "चलन भरून येवू का" असे विचारले असता सुनिल चव्हाण यांनी मला "नको या आता या" असू म्हणून फोन कट केला. सदरचा कॉल पाटील साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डवर रेकॉर्ड केला.

श्री.सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी मला लागलीच लाच रक्कम घेवून येण्यास सांगितले असल्याने पाटील साहेब यांनी पुन्हा सुनिल चव्हाण यांचेविरूध्द मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय कडेगाव येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना यापुर्वी दिले सापळा कारवाईच्या सुचनांची उजळणी करून देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच परांजपे असे माझेकडील मोटार सायकलवरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय कडेगाव येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, पंच कुदळे व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय कडेगाव येथे दाखल झाले. मी व पंच परांजपे असे माझेकडील मोटार सायकलने मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दाराचे समोरील मोकळया जागेमध्ये गेलो. त्यावेळी सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार हे कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दाराचे समोरील मोकळया जागेमध्ये थांबलेले दिसले. मी व पंच परांजपे असे सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचेजवळ गेलो. त्यावेळी मी सुनिल चव्हाण यांना "ती कपाट घावल न्हाय ओ मला...म्हणल कुणीतरी उचलल म्हणजे मला फाळकुट लागायच" असे म्हणालो. त्यावेळी सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी हाताने इशारा करून माझेकडे लाचेची मागणी केली. त्यावेळी मी माझे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशातील 40,000/- रुपये अॅथ्रॉसिन पावडर लावून ठेवलेली लाच रक्कम माझे उजवे हाताने बाहेर काढुन श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचे समोर धरली असता श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी लाच रक्कम त्यांचे उजवे हाताने स्विकारुन त्यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजूचे खिश्यामध्ये ठेवली. त्यावेळी मी माझेकडील हातरूमाल डावे हाताने बाहेर काढून हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारले बाबत पुर्व नियोजीत इशारा केला. लागलीच सापळा पथक माझेजवळ आले व पाटील साहेब यांनी माझेकडील डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेवून मला बाजूला जावून थांबण्यास सांगितले. सापळा पथकाने श्री.सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांना पकडले.

सदर ठिकाणी पाटील साहेबांनी श्री. सुनिल चव्हाण यांना त्यांचे नाव गांव विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री.

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

A. D. Parmal

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

पोलीस स्टेशन ऑफिसर

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** JITENDRA Prabhakar
**Rank(**पद**):** I (Inspector)
**No.(**सं.**):** PNMAH69255

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): अमोल बाळासो पवार

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1985

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पवार मळा पलुस ,तापलुस,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पवार मळा पलुस ,तापलुस,पलूस ,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.):

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | लोकसेवक सुनिल जोतिराम चव्हाण | | | 1. मराठी शाळे जवळ तुरची, तातासगांव,तासगांव,सांगली, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

त्यांनी मला कडेपूर येथे येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी सकाळी 11.00 वा चे सुमारास माझेकडील एचएफ डिलक्स मो.सा. नंबर एमएच-10-सीएस-3218 वरून कडेपूर येथे येवून श्री. संदीप पाटील साहेब यांना संपर्क केला असता त्यांनी मला कडेपूर ते विटा जाणारे रोडवरील आरफळ कॅनॉलचे रोडकडेला येण्यास सांगितले. त्याप्रमाणे मी आरफळ कॅनॉलचे रोडकडेला जावून श्री. संदीप पाटील साहेब यांची भेट घेतली. त्यावेळी पोलीस उपअधीक्षक श्री. संदीप पाटील यांनी मला त्यांचेकडील खाजगी वाहनामध्ये बसण्याच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे मी माझेकडील मोटार सायकल पार्क करून त्यांचेकडील खाजगी वाहनामध्ये बसलो. श्री. संदीप पाटील साहेब यांनी मला त्यांची सापळा पथकाची व दोन सरकारी पंचांची ओळखी करून दिली. त्यानंतर मी पाटील साहेब व पंचांना माझी श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचेविरूध्द लाच मागणी बाबतची तक्रार समक्ष सांगितली असता पाटील साहेब यांनी मला तसा लेखी अर्ज देण्यास सांगितला. त्याप्रमाणे मी त्यांना माझा लेखी तक्रारी अर्ज दिला. माझे तक्रारी अर्जावर पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब व दोन्ही पंचानी वाचून सह्या केल्या.
त्यानंतर श्री.सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पाटील साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. व सदर कारवाई वेळी पंच नं.1 म्हणून श्री. परांजपे यांनी व पंच नं.2 म्हणून श्री. कुदळे यांनी काम करण्याचे निश्चित केले.

त्यानंतर पाटील साहेब यांनी मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्यामध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच नं.1 परांजपे असे माझेकडील मोटार सायकलने रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय कडेगाव येथील उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव येथे जावून श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांची भेट घेवून परत श्री. पाटील साहेब थांबलेल्या ठिकाणी आलो. सदर पडताळणी कारवाईमध्ये मध्ये पाटील साहेबांनी मला व पंच परांजपे यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यामध्ये मी श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांना माझे सोबत असले पंच नं.1 परांजपे यांची ते मंजुळा कांबळे यांचे भाऊ आहेत अशी ओळख करून दिली. त्यानंतर माझेत व सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांचेमध्ये आमचे जमिनीचे गुंठेवारी नियमानुकुल आदेश देणेबाबत चर्चा झाली. त्यावेळी सुनिल चव्हाण यांनी मला "ही एक गुठयांचे आहे" असे म्हणून मला त्यांचेकडील कॅलक्युलेटवर 20,000/- असा आकडा टाईप करून मला दाखविला. त्यावर मी त्यांना "ही विस हजार" असे विचारले असता सुनिल चव्हाण यांनी मला "हा" असे म्हणाले. त्यानंतर सुनिल चव्हाण यांनी मला "हे दिड गंुठयांचे" असे म्हणून मला पुन्हा कॅलक्युलेटवर 25,000/- असा आकडा टाईप करून मला दाखवविला. त्यावर मी त्यांना "हे दिड गुंठयाचे पंचवीस हजार" असे विचारले असता सुनिल चव्हाण यांनी मला "हा" असे म्हणाले. त्यावर मी सुनिल चव्हाण यांना पैसे कमी करणेबाबत विनंती केली त्यावर सुनिल चव्हाण यांनी मला "हे त्याप्रमाणे करा, आणि त्यामध्ये कमी करा, दोन्हीचे पण करा" असे म्हणून पुन्हा कॅलक्युल्येटवर 40,000/- असा आकडा टाईप करून मला दाखवून सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी माझ्याकडे तडजोडी अंती दोन्ही प्रकरणांचे मिळून एकुण 40,000/- रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम आजच घेवून येण्यास सांगितले.
एकंदरीत झाले पडताळणी कारवाईमध्ये श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांनी पैसे लागलीच घेवून येण्यास सांगितले असल्याने श्री.पाटील साहेब यांनी लागलीच श्री. सुनिल चव्हाण, नायब तहसिलदार यांच्यावर सापळा कारवाई आयोजित करण्याचे निश्चित केले. त्यानंतर पाटील साहेब यांनी सापळा कारवाई करीता त्यांचे पथकाकडील आणखीन अधिकारी व कर्मचारी यांना बोलावून घेतले. व मला लाच रक्कम हजर करणेबाबत सांगितले. काही वेळानंतर मी माझेकडील शिल्लकीतील 40,000/- रुपये पाटील साहेब यांचे समक्ष हजर केले. त्यावेळी पाटील साहेब यांनी त्यांचेकडील सापळा कारवाई करीता हजर झालेले अधिकारी व कर्मचारी यांची ओळख करून दिली. त्यानंतर श्री. पाटील साहेब यांनी लाच रक्कमेचे नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर दोन्ही पंच व श्री.पाटील साहेब यांनी सहया केल्या. श्री. पाटील साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यामध्ये ठेवली व पाटील साहेबांनी सापळापुर्व कारवाई करून मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझे गळ्या मध्ये अडकवला. त्यानंतर मी व पंच परांजपे असे माझेकडील मोटार सायकलवरून रवाना होवून मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय कडेगाव येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पाटील साहेब, पंच कुदळे व सापळा पथक असे त्यांचेकडील खाजगी वाहनाने मध्यवर्ती प्रशासकीय कार्यालय येथे दाखल झाले. मी व पंच परांजपे असे माझेकडील

सुनिल जोतीराम चव्हाण, वय 50 वर्ष, व्यवसाय- नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव, राहणार मराठी शाळेजवळ तुरची ता.तासगाव, जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

सदर ठिकाणी सापळा कारवाई मधील प्राथमिक तपासण्या करून पुढील सविस्तर पडताळणी सापळापूर्व सापळा पंचनामा तसेच इतर कार्यवाही ही शासकीय विश्रामगृह कडेगाव येथे पूर्ण करण्यात आली.

तरी दि. 17.11.2023 रोजी 11.37 वा. ते 16.09 वा. च्या दरम्यान लोकसेवक श्री. सुनिल जोतीराम चव्हाण, वय 50 वर्ष, व्यवसाय- नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव, राहणार मराठी शाळेजवळ तुरची ता.तासगाव, जि.सांगली यांनी आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने मी विक्री केलेल्या जमिनीची अकृषीक आकारणी करून गुंठेवारी नियमानुकुल आदेश देणेसाठी स्वत: करीता माझेकडे 45,000/- रूपयांची लाचेची मागणी तडजोडीअंती 40,000/- रूपयांची मागणी करून मध्यवती प्रशासकीय कार्यालय कडेगाव कार्यालयाचे मुख्य प्रवेशव्दाराचे समोर असले मोकळया जागेमध्ये माझ्याकडून 40,000/- रूपये लाच रक्कम स्विकारली आहे. म्हणून माझी लोकसेवक श्री.सुनिल जोतीराम चव्हाण, वय 50 वर्ष, व्यवसाय- नायब तहसिलदार, उपविभागीय अधिकारी कार्यालय कडेगाव, राहणार मराठी शाळेजवळ तुरची ता.तासगाव, जि.सांगली यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिं्रट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

JITENDRA Prabhakar SHAHANE(I (Inspector)) / PNMAH69255 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)